# सागराच्या तळाशी

…जा मंगळवेढेकर

म.ग्रं.सं. वाचनालय, ठाणे
विषय :
दा. क्र. २८५७



BVBK-0402857

बा. वा.
२८५६
९।९।९३

म. ग्रं. सं. ठाणे, वाचनालय शाखा.
बाल वाङ्मय विभाग
वा. क्र. २८५७ दिनांक ९।९।९३
विभाग बा. वा. क्र.

अनिरुद्ध बाल-विज्ञान



# सागराच्या तळाशी

राजा मंगळवेढेकर

BVBK-0402857

अनिरुद्ध साहित्य

**सागराच्या तळाशी**

राजा मंगळवेढेकर


**मुखपृष्ठ**
ल. म. कडू

**आतील रेखाचित्रे**
वसंत सहस्रबुद्धे

**प्रकाशन तिथी**
१५ ऑगस्ट १९९२



**सर्वाधिकार**
सुरक्षित



**प्रकाशक**
गजानन क्षीरसागर
अनिरुद्ध साहित्य
१४९३ क, सदाशिव पेठ,
पुणे ४११ ०३०

**मुद्रक**
लालदास लोंढे
रेवती मुद्रणालय
सर्व्हे नं. १२९, दत्तवाडी
पुणे ४११ ०३०

**मूल्य अठरा रुपये**

□ □ □

उन्हाळ्याच्या सुटीत दिलीपने स्वत:च बनविलेल्या कब्मरीनमधून, सागराच्या तळाशी त्याने केलेल्या भ्रमंतीची ही कहाणी.

काल्पनिकच, परंतु विज्ञानाची आणि निसर्गाची गूढ गुपिते उलगडून दाखविणारी मनोरंजक आणि संवादरूपाने सांगितलेली.

समुद्राबद्दल बाळगोपाळांना नाही तरी आकर्षण फार असते. दिलीपबरोबर त्यांनाही या कहाणीतून सागराची आणि सागरातील जीवसृष्टीची ओळख होईल.


अनिरुद्ध बाल–विज्ञान मालिकेतून प्रसिद्ध होत असलेली ही ' सागराच्या तळाशी ' सर्वांनाच हमखास आवडेल.

अगदी बालवयातच मुलांच्या वाचनात अशी सोपी विज्ञान पुस्तके आली तर त्यांची मने आपोआपच समृद्ध बनतील आणि आजची ही बालके उद्याचे विज्ञाननिष्ठ नागरिक बनतील !

□ □ □

## अनुक्रम


| | |
|---|---|
| १. पाणबुडी निघाली | ५ |
| २. समुद्राची कहाणी | ११ |
| ३. तळातून फेरफटका | १८ |
| ४. अद्‌भुत् प्रदेशात | २४ |
| ५. चित्रविचित्र सृष्टीत | ३३ |
| ६. मत्स्यदर्शन | ४० |
| ७. लाटांवर स्वार | ४७ |
| ८. पाणबुडी परतली | ५५ |



## १. पाणबुडी निघाली

गतवर्षी दिलीपने रॉकेट बनवले आणि तो आभाळातून चक्कर मारून आला, सूर्य, चंद्र, ग्रह, तारे, आकाश-गंगा, धूमकेतू यांच्याशी त्याची ओळख झाली. अंत-राळातल्या अनेक गूढ-जमती त्याला उमगल्या. त्याची उन्हाळ्याची सुटी मजेशीर गेली. तो खूष होता.

याही वर्षी, नेमेचि येणाऱ्या उन्हाळ्याप्रमाणे, उन्हाळा आला. वार्षिक परीक्षा संपल्या. उन्हाळ्याची सुटी पडली. दिलीपची भावंडे आणि सवंगडी सुटीत कुठे जायचे, काय करायचे याचे बेत आखीत होते. या वर्षी दिलीप काय करणार ? कुठे जाणार ? त्या साऱ्यांना साहजिकच उत्सुकता होती. कारण गतवर्षीची दिलीपची

आभाळातली चक्कर, दिलीपच्याच तोंडून त्यांनी नंतर ऐकली होती. त्यांना मोठी गंमत वाटली होती. गंमतीबरोबरच नवीन नवीन ज्ञान, माहिती त्यांना मिळाली होती. त्यामुळे या वर्षी देखील दिलीपचा काही वेगळाच बेत असणार, हे नक्कीच! 'विचारू तरी दिलीपला' असे म्हणून सारेजण माडीवरच्या शेवटच्या खोलीत आले. ही खोली म्हणजे दिलीपची प्रयोगशाळाच! आणि दिलीपराव खरेच आपल्या प्रयोगशाळेत गढून गेले होते.

साऱ्या खोलीभर पसारा पडलेला होता. निरनिराळी लहान मोठी पुस्तके, पुठ्ठे, कात्री, डिंक, ब्लेड, कंपास इत्यादि वस्तूंनी दिलीपच्या प्रयोगशाळेला एखाद्या अजवघराचे स्वरूप आलेले होते. परीक्षा संपताच अभ्यासाची पुस्तके नीट बांधून ठेवून दिलीप नव्या उद्योगाला लागला लागला होता. पुस्तकांमागून पुस्तके नीट बांधून मासिके चाळत होता. कागदावर काही आकृत्या काढीत होता. टिपणवहीत कसली टाचणे उतरीत होता. तो आपल्या कामात दंग होता.

संजीव, राजीव, शुभा, कुंदा ही सगळीजणं त्याच्या खोलीत आली. पण दिलीपचे कुठे लक्ष होते? त्याने पाहिले देखील नाही. तो आपल्याच तंद्रीत होता. मग थोड्या वेळाने राजीवच म्हणाला,

'काय दिलीपराव! या वर्षी कुठं चक्कर मारायची नाही का?'

'नाही कशी?' दिलीप आपल्या तंद्रीतून भानावर येत म्हणाला.

'त्याचीच ही तयारी वाटतं?' शुभाने विचारले.

'हो. दुसरे काय!' दिलीप म्हणाला.

'पण कुठे जायचा विचार आहे, दिलीप?' संजीवने विचारले.

'समुद्राच्या तळाशी!' दिलीपने आत्मविश्वासाने सांगितले.

'बापरे!' कुंदा म्हणाली.

'का ग?'

'म्हणजे हे तुझं धाडस औरच दिसतं !'

'ते कसं काय ?'

'अरे म्हणजे, आभाळातून चक्कर मारणं निराळं आणि समुद्राच्या तळाशी जाणं निराळं. नाही का रे संजू ?'

'हो बुवा. आपल्याला तर भयंकरच वाटतंय हे !'

'मला देखील बाई भीतीच वाटते समुद्राची.' शुभा म्हणाली.

पण दिलीप हसला. तो हसत हसतच म्हणाला,

'अरे, गतवर्षी आभाळातून चक्कर मारण्याचा बेत आखला तेव्हा देखील तुम्ही असंच म्हणाला होतात, पण एकट्या काकांनी मला प्रोत्साहन दिलं होतं. तेव्हा सुद्धा तुम्हाला माझा तो बेत औरआणि धाडसीच वाटला होता आणि बरं का संजू, शुभा ! नवीनच काही करायचं, तर ते आधी और असलंच पाहिजे. मग और काही करायचं ठरवल्यावर त्यासाठी धाडस केलंच पाहिजे, नाही का ?'

'हो. हे खरं आहे. पण–' शुभा बोलता बोलता थांबली.

'थांबलीस का ? बोल की ! पण काय ?'

'पण समुद्रात जाणार कसा तू ?'

'ह्यॅ ! त्यात काय अवघड आहे ?'

'अरे दिलीप, समुद्रावरून तू जहाजातून आगबोटीतून प्रवास करू शकशील पण तू तर म्हणतोस की तुला भटकायचंय समुद्राच्या तळाशी !'

'होय, होय. समुद्राच्या तळाशी ! अरे, समुद्रावरून जहाजातून, बोटीतून कुणीही जातं येतं. त्यात आता काही विशेष राहिलेलं नाही; आणि म्हणून तर मी ठरवलं आहे की या वर्षीची चक्कर समुद्राच्या तळातून मारायची !'

'शाब्बास दिलीप ! शाब्बास !!' काकासाहेब खोलीत येत

म्हणाले. त्यांच्या पाठोपाठ दिलीपचे बाबा आणि आई देखील आली होती. काकासाहेब त्यांच्याकडे वळून म्हणाले,

'म्हटलं नाही मी तुम्हाला की, दिलीपची काही तरी खटपट सुरू झालेली असणार म्हणून.'

'भारीच खटपटी आहे नाही तरी दिलीप!' आई कुरकुरली.

'खटपटीशिवाय का मनातल्या इच्छा साकार करता येतील?' बाबा म्हणाले. दिलीपला उत्साह मिळाला. काकासाहेबांनी विचारले,

'गतवर्षी रॉकेट बनवलं होतंस, दिलीप; यंदा काय करणार आहेस? तयारी तरी चाललेली दिसतेच आहे.'

'यंदा करणार आहे–पाणबुडी!' दिलीप म्हणाला.

'पाणबुडी?'

'होय. ही पहा ना! आणि ती सुद्धा अगदी नवीन. अद्ययावत्!'

'म्हणजे?'

'अलिकडे एक किंवा दोन माणसेच वसू शकतील अशा छोट्या पाणबुड्या अमेरिकेत बांधण्यात आल्या आहेत. त्यांना म्हणतात 'कब्मरीन.'

'कब्मरीन!'

'हं.'

'अरे म्हणजे एक माणसाच्या विमानाप्रमाणेच की, काय बरं म्हणतात त्या विमानांना–'

'ग्लायडर!'

'हं, ग्लायडर ग्लायडर!'

'तर ग्लायडर सारख्याच ह्या एकमाणसी कब्मरीन. आणि बरं का, काकासाहेब! ही पाणबुडी पाण्यात दोनशेपंचवीस फुटां-पर्यंत खोल जाऊ शकते. चार वेगवेगळ्या सिलींडरनी या पाण-

बुडीत हवा मिळू शकते.'

'आणि आत वसल्यावर पहायचं कसं?' कुंदाने विचारले.

'पाणबुडीच्या सभोवार काचेच्या चार खिडक्या असतात की पहायला. त्यातून पहाता येते.'

'पण इतक्या खोल उजेड नसेल तर?' राजीवने विचारले.

'तर प्रखर प्रकाशाचे झोत बाहेर समुद्रात सोडण्याची देखील व्यवस्था कब्मरीनमध्ये केलेली असते. त्यामुळे पाण्यातील वस्तूंचे प्राण्यांचे चांगले निरीक्षण करता येते.'

'अरे वा! मग मजाच आहे म्हणायची.' बाबासाहेब उद्गारले. काकासाहेब दिलीपच्या पाठीवरून कौतुकाने हात फिरवीत म्हणाले,


'दिलीप, तुझ्या खटपटीला यश येवो! तुझी कब्मरीन उत्कृष्ठ होईल यात शंकाच नाही. पण तू कब्मरीनमधून समुद्राच्या तळाशी फेरफटका मारून सुखरूप परत येशील याबद्दलही मला खात्री आहे.'

दिलीपच्या खटपटीचे कौतुक करीत सगळे खाली निघून गेले. काकासाहेबांच्या व बाबासाहेबांच्या बोलक्या प्रोत्साहनाने आणि आईच्या मूक संमतीने दिलीपचे बळ वाढले होते. अवतीभवतीच्या पसाऱ्यात कब्मरीनची चित्रे होती. दिलीपने त्यावरहुकूम काही भाग पुठ्ठ्याच्या साहाय्याने बांधूनही काढला होता. त्याकडे पहाता पहाताच त्याच्या डोळ्यापुढे विशाल सागर हेलकावू लागला. आपली 'कब्मरीन' पाणबुडी तयार होऊन समुद्रावर तरंगत असल्याचे त्याला दिसले. बघता बघता कब्मरीन गतिशील झाली. तिच्यातील यंत्रांची हालचाल ऐकू येऊ लागली. दिलीप पटकन् कब्मरीनमध्ये बसला. हवेची, प्रकाशाची साधने व्यवस्थित आहेत

याची त्याने एकदा खात्री करून घेतली. मग तो आनंदाने, उत्साहाने आपल्याशीच पुटपुटला, ‘ चला ! समुद्राच्या तळाशी ! ’

आणि कळ दाबताच कब्मरीन पाणबुडीने अफाट समुद्राच्या पोटात बुडी घेतली.

• •



## २. समुद्राची कहाणी

दिलीपची कब्मरीन वेगाने निघाली. अथांग समुद्राच्या पोटातून चालली. पाण्याचा खळखळाट, लाटांचा गड-गडाट आणि कब्मरीनच्या यंत्रांचा घरघराट तेवढा ऐकू येत होता. आजुबाजूला ना जमीन, ना झाडे. वरती ना ढग, ना तारे, ना आभाळ. सगळीकडे पाणीच पाणी ! पाणीच पाणी ! !

दिलीपला मनूच्या गोष्टीतल्या प्रलयाची आठवण झाली. जग-बुडीच्या वेळी सगळीकडे पाणीच पाणी होत असेल याची कल्पना आली. पाण्याचा तो अफाट विस्तार पाहून दिलीप मनाशीच पुट-पुटला.

'अबब ! केवढा हा समुद्र ! कसा निर्माण झाला असेल ? केव्हा झाला असेल ? कोणी केला असेल ?...'

कब्मरीनच्याच वेगाने दिलीपचे विचारचक्रही वेगाने चालले होते. कब्मरीन पाण्याचे थर कापीत चालली होती. पुढे पुढे चालली होती. दिलीप विचारात दंग होता .. 'समुद्र केव्हा निर्माण झाला असेल ? कसा निर्माण झाला असेल ?'

कब्मरीन समुद्राच्या तळाकडे चालली होती. पाण्याचे थर कापीत, ओलांडीत ती चालली होती जसजशी कब्मरीन खाली तळाकडे जाऊ लागली. तसतसे दिलीपला श्वासोच्छ्वास करणे जड जाऊ लागले. प्राणवायूचा तुटवडा समुद्राच्या खोलीतही भासतो तर ! दिलीपने चटकन् ऑक्सिजनची नळी सरसावली. त्यावरोबर त्याला श्वासोच्छ्वास करता येऊ लागला.

कब्मरीन समुद्राचे थर ओलांडीत चालली, तसा सूर्यप्रकाशही कमी कमी होत चालला. दीडशे फुटांखालून जेव्हा दिलीपचा प्रवास सुरू झाला, तेव्हा तर लाल, पिवळे, हिरवे प्रकाशकिरण कुठल्या कुठे गडप झाले आणि उरला होता केवळ सभोवती निळा प्रकाश! सगळे निळेच दिसू लागले. दिलीपला गंमत वाटली. त्याने इकडे तिकडे पाहिले. खिशातून कसलासा छापील कागद काढला व तो वाचू लागला. कब्मरीन वेगाने खाली खाली जात होती. चारशे फुटांवर गेली तेव्हा तर कागदावरचे धड वाचताही येईना. निळा प्रकाश देखील मद मंद होत चालला होता. शेवटी, सुमारे दोन हजार फुटांवर जेव्हा कब्मरीन पोचली, तेव्हा तर सगळीकडे काळोखच काळोख पसरलेला दिसला.

आणि सभोवती घनदाट अंधाराप्रमाणेच कडक थंडी देखील जाणवू लागली. जसजशी कब्मरीन पाण्याच्या वेगवेळचा थरांतून

खाली खाली जात होती, तसतसे पृष्ठभागावरचे प्रमाण कमी कमी होत जाऊन, थंडीचे प्रमाण वाढत असल्याचे दिलीपच्या लक्षात आले. तीन-चार मैल खोल गेल्यावर तर पाण्याचे बर्फात रूपांतर होण्याच्या स्थितीतूनही उष्णतामान खाली घसरल्याचे दिलीपजवळच्या वायूमान–मोजपट्टीने दाखविले.

सभोवार अंधार ! कडक थंडी ! कब्मरीन प्रकाशझोत टाकीत चालली होती. दिलीपला या नव्या, अद्‌भुत प्रदेशाबद्दल अधिकाधिक आश्चर्य वाटत होते कुतूहल वाटत होते. त्याचे विचार–चक्र सुरूच होते– 'समुद्र निर्माण झाला कसा ? केव्हा ? कधी ?...'

एवढ्यात काळोख उजळून टाकणारी वीज चमकावी तसा एक प्रकाशाचा झोतच्या झोत कब्मरीनपुढे येताना दिसला. तो प्रकाश झोत एवढा प्रखर होता की, दिलीपचे डोळेच दिपले ! त्याने हळू हळू पाहिले, तर त्याला कब्मरीन कुठेतरी थांबलेली दिसली. आणि एक तेजस्वी परीसारखी स्त्री त्याला म्हणत होती–

'दिलीप, सुस्वागतम् !'

'कोण तुम्ही ?'

'मी आहे जलपरी ! समुद्रकन्या !'

'खरंच !'

'हं.'

'गोष्टीत वाचलं होतं खरं !'

'गोष्टीतलं खरं खोटं माहीत नाही.'

'बरं बरं ! पण एक सांगा !'

'काय ?'

'मी कुठं आलो आहे आता ?'

'समुद्राच्या तळाशी !'

‘समुद्राच्या तळाशी ?’

‘हो.’

‘म्हणजे ?...

‘म्हणजे खूप खूप खोल. खूप पाण्याखाली. खूप अगदी तळाशी.’

‘किती खोल तळ असावा बरं हा ?’

‘असेल की सुमारे दहा किलोमीटर खोल !’

‘दहा किलोमीटर !’

‘हो. पण दिलीप, समुद्राची खोली सगळीकडे काही सारखी नाही, बरं का ! कमी जास्ती आहे.’

‘अस्सं !’

आपण दहा किलोमीटर खोल आहोत या कल्पनेने दिलीप आश्चर्यचकित झाला होता. तेवढ्यात जलपरी म्हणाली, ‘बरं दिलीप ! आता तू आमचा पाहुणा. तुला समुद्राचे अंतरंग पाहायचे आहे ना ?’

‘हो. हो. आणि–’

‘आणि मुळात समुद्रच कसा निर्माण झाला, केव्हा झाला, हेही तुला सांगेन हं मी.’

जलपरीच्या प्रेमळ वागणुकीने दिलीपला बरे वाटले.

आपली समुद्रयात्रा यशस्वी होणार याला त्याला आनंद झाला. जलपरी म्हणाली,

‘थोडी विश्रांती हवी आहे का ?’

‘नको–नको. तसा काही दमलो नाही मी. विश्रांतीपेक्षा समुद्राची जन्मकहाणी ऐकायलाच मी उत्सुक आहे. सांगा ना!’

दिलीपची उत्सुकता पाहून जलपरीला हसू आले. गालातल्या गालात हसत ती म्हणाली,

'ऐक तर !'

'हं.'

'फार फार दिवसांपूर्वीची गोष्ट. फार म्हणजे फारच. पुष्कळ. सुमारे दोन अब्ज वर्षांपूर्वीची !'

'वापरे !'

'हो. तर त्यापूर्वी समुद्र काही जगाच्या पाठीवर कुठे नव्हता.'

'नुसतीच पृथ्वी असेल मग ?'

'हो. नुसतीच पृथ्वी एकटी. आणि समुद्र-जन्माशी पृथ्वीचा संबंध फार आहे बरं का, दिलीप !'

'अस्सं ?'

'हं. कारण पृथ्वीवरच समुद्र निर्माण झाला आहे, हे उघड आहे.

'हो. म्हणजे पृथ्वी आधी जन्मली हे खरेच !'

'तर पृथ्वी कशी निर्माण झाली हे आता नाही सांगत मी दिलीप तुला.'

'नको–नको. ते माहीत आहे मला. सूर्यापासून पृथ्वी जन्मली.'

'हं. तर जेव्हा पृथ्वीचा जन्म झाला, तेव्हा पृथ्वी म्हणजे आगीचा एक भडकता गोळा होता. हळूहळू हा गोळा थंड होत गेला आणि टणकही बनला. ही क्रिया सुरू असतानाच पृथ्वीच्या पाठीवर कुठं उंचवटे निर्माण झाले, तर कुठे सखल, खोलगट भाग तयार झाले.'

'बरं बरं, म्हणजे एखादा पातळ गरम पदार्थ निवताना त्याच्या वरची साय जशी सुरकुतलेली बनते, तसं !'

'हं बरोबर आहे तुझं, दिलीप. तर अशा प्रकारे पृथ्वीचा पृष्ठ-भाग बनला. पुढं मुसळधार पाऊस पडू लागला. इतका मोठा पाऊस इतका मोठा पाऊस दिलीप, की तू आज कल्पनाही करू शकणार

नाहीस.'

'अरे बापरे ! पण किती दिवस ?'

'दिवस ? अरे, वर्षं म्हण !'

'बरं किती वर्षं ?'

'हजारो वर्षं !'

'काय म्हणता ?'

'होय होय, हजारो वर्षं असा मुसळधार पाऊस पृथ्वीवर नुसता कोसळत होता. या पावसाचे पाणी मग जाणार कुठं ?'

'कुठं गेलं वरं ?'

'पृथ्वीवर. ती निवताना जेव्हा खोलगट भाग बनला होता ना त्या भागात हे पाणी जमा झालं. साठून राहिलं–'

'आणि त्याच जलाशयाला आपण म्हणू लागलो समुद्र ! होय ना ?'

'अगदी बरोबर !' जलपरी हसत हसत म्हणाली.

पृथ्वीशी अशा प्रकारे समुद्राचा संबंध आहे तर !' दिलीप म्हणाला.

'हो. आणि पृथ्वीच्या पाठीवर जसा समुद्र जन्मला, तशी ही जीवसृष्टी समुद्राच्या पोटात जन्मली !'

'म्हणजे काय ?' दिलीपने आश्चर्याने विचारले.

जलपरी सांगू लागली,

'म्हणजे समुद्र जन्मापूर्वी पृथ्वीच्या पाठीवर कसलीही जीवसृष्टी नव्हती.'

'अस्सं ?'

'हं.'

'वा ! वा ! खरोखर गंमतशीर कल्पना आहे अगदी !' दिलीप

स्वत:शीच पुटपुटला. मनाशीच हसला. जलपरीने विचारले,

'काय, कसली कल्पना ?'

'पाण्याला संस्कृत भाषेत म्हणतात जीवन.'

'हो.'

'जीवनाची मूळ उत्पत्ती समुद्रात, म्हणजे पाण्यातच झालेली नाही का ? तेव्हा 'जीवन या शब्दाचा सार्थ अर्थ एकदम लक्षात आला !'

'मोठा चुणचुणीत आणि हुषार मुलगा आहेस तू दिलीप !'

जलपरी त्याच्याकडे कौतुकाने पहात म्हणाली, 'बरं, आता आपण इथंच थांबू या. समुद्राविषयींची इतर माहिती मी तुला नंतर सांगीन.'

'नुसतं सांगीन नको.'

'मग ?'

'दाखवलंही पाहिजे.'

'बरं बरं दाखवीन.' जलपरीने आश्वासन दिले.

• •

म. ग्रं. सं. ठाणे, वाचनालय शाखा.
बाल वाङ्मय विभाग.
बा. क्र 2८५५ दिनांक ९।८।८३
विषय बा.वा. क्र.



## ३. तळातून फेरफटका

दुसरे दिवशी समुद्राच्या तळातून फेर-फटका मारण्या-साठी दिलीप तयार झाला. जलपरीने विचारले,

'निघायचं का, दिलीप ?'

'हो, हो. तर !'

आणि दिलीपच्याच कब्मरीनमधून ते निघाले. कब्मरीन चालू झाली. पाणी कापू लागली. दिलीपने विचारले,

'काल तुम्ही समुद्र निर्माण झाला, हे सांगितलेत. पण समुद्र किती आहेत ते नाही सांगतले.'

'अरे, तू विचारलं तेवढंच सांगितलं. आता सांगते.' जलपरी म्हणाली.

'सांगा तर!'

'पण आधी तू माझ्या एका प्रश्नाचं उत्तर दे पाहू.'

'विचारा प्रश्न.'

'पृथ्वी, म्हणजे जमीन जास्ती आहे की समुद्र?'

'अर्थात जमीन!'

'चूक.' जलपरी हसून म्हणाली.

'वा! चूक कशी? पृथ्वीवर जमिनीचा भाग तर केवढा आहे! केवढे पर्वत, केवढे डोंगर, केवढी खोरी, केवढी शेती! शिवाय रस्ते, शहरे, खेडी...'

'तरी देखील तुमच्या पृथ्वीवरील जमीन कमीच आहे, दिलीप!'

'असं? मग सागर तरी असा कितीसा मोठा आहे हो?'

'समुद्र ना, चांगला चौदा कोटी, पन्नास लक्ष क्षेत्रफळावर पसरलेला आहे!'

'आणि जमीन?

'जमीन आहे पाच कोटी, वीस लक्ष क्षेत्रफळ इतकी.'

'बापरे! म्हणजे सागर खरंच मोठा आहे की!'

'तर! पृथ्वीवरचे सुमारे बहात्तर टक्के क्षेत्रफळ समुद्राने व्यापले आहे. पण दिलीप, एवढे काही आश्चर्य वाटायला नको. तुला. कारण माणसाच्या शरीरातही पाण्याची अशीच विभागणी झालेली असते.'

'कशी?'

'प्राण्यांच्या शरीरातही तीन चतुर्थांश भाग जलतत्त्वानेच व्यापलेला असतो.'

‘ अस्सं ! पण समुद्र किती आहेत हो ?’

‘ हं. सांगते. समुद्र आहेत एकूण तीन !’

‘ कोणकोणते ?’

‘ प्रशान्त ! यालाच म्हणतात पॅसिफिक महासागर. ’

‘ प्रशान्त ! वा ! नाव तर छानच आहे. ’ दिलीप म्हणाला,

‘ कशावरून हे नाव ठेवले असावे ?’

‘ मॅगलन नावाच्या दर्यावर्दी गृहस्थाने सर्वात प्रथम जहाजातून पृथ्वी-प्रदक्षिणा केली. त्यावेळी तो अटलांटिक महासागरातून आला होता आणि अटलांटिक महासागराच्या मानाने हा महासागर त्याला खूप शांत, खूप मोठा दिसला. म्हणून त्याचे त्याने नावच ठेवून टाकले– पॅसिफिक !’

‘ दुसऱ्या महासागराचे नाव अटलांटिक वाटते ?’

‘ हं, माझ्या बोलण्यातून तुझ्या लक्षात आलंच आहे ते. ’

‘ त्याच्या नावाची काही कथा ?’

‘ आहे तर ! यूनानी लोकांची देवता–अॅटलास. ’

‘ हो. ऐकलंय हे नाव मी. ’

‘ कुठं ?’

‘ कुठं बरं ? हं. हं. आमच्या नकाशांच्या पुस्तकालाच अॅटलास म्हणतात !’

‘ बरोबर ! तर अॅटलास ही युनानी लोकांची देवता. या देवतेचंच नाव त्यांनी या महासागराला देऊन टाकले. अॅटलासवरून झालं अॅटलांटिक ! त्यांची अशी श्रद्धा आहे की, अॅटलास देव आफ्रिकेच्या समुद्र-तटावर उभा आहे. हा देव म्हणजे प्रचंड शक्तीचा साक्षात्कारच. समोरच्या समुद्राला पाहून त्याने सगळे आभाळच आपल्या खांद्यावर घेतले !’

दिलीपला ॲटलास देवतेच्या शक्तीबद्दल आदर वाटला. त्याने विचारले, ‘ आणि तिसरा समुद्र कोणता ?’

‘ हिन्दी महासागर !’

‘ हा हिंदुस्तानजवळून वाहतो म्हणूनच याला बहुधा हे नाव मिळाले असावे. नाही का ?’ दिलीपने विचारले, जलपरी कौतु-काने हसून म्हणाली, ‘ हो. हो. खरा आहे, दिलीप तुझा तर्क ! या-शिवाय आणखीही दोन महासागरांची नावे कधी तरी कदाचित् तू ऐकली असशील– ‘ आर्क्टिक ’ आणि ‘ अंटार्क्टिक. ’

‘ भूगोलात वाचल्यासारखं आठवतं. ’

‘ पण पहिला, म्हणजे ‘ आर्क्टिक ’ हा अटलांटिकचाच एक भाग आहे आणि दुसऱ्या ‘ अंटार्क्टिक ’च्या सीमा अद्यापि निश्चित झालेल्या नाहीत. हे दोन्हीही महासागर दक्षिण व उत्तर ध्रुवाजव-ळून वाहात असल्यामुळे दक्षिण महासागर व उत्तर महासागर या नावानेही ओळखले जातात. ’

‘ परंतु सर्वात मोठा महासागर कोणता ?’

‘ प्रशान्त महासागर ! हा महासागर इतका मोठा आहे दिलीप की, पृथ्वीवरील सर्व खंडांचे क्षेत्रफळ याच्या क्षेत्रफळाइतके भरते. अटलांटिक महासागर आणि हिन्दी महासागर या दोन्ही महा-सागरांएवढा विस्तार एकटचा प्रशान्त महासागराचा आहे !’

‘ अबबब !’

‘ सुमारे सोळा हजार किलोमीटर हा पसरलेला असून, जगाचा जवळ जवळ अर्धा भाग याने व्यापलेला आहे. ’

‘ बापरे ! खरंच ‘ प्रशान्त ’ आहे बरं का मग तो. आणि त्या खालोखाल कोणता ?’

‘ प्रशांतच्या खालोखाल आहे अटलांटिक महासागर. याचा

विस्तार सुमारे तीन कोटी तीस लक्ष क्षेत्रफळाइतका आहे.'

'आणि आपला हिन्दी महासागर ?'

'हिन्दी महासागराचा विस्तार आहे एक कोटी सत्तर लक्ष क्षेत्रफळाएवढा.'

'म्हणजे अटलांटिक महासागराच्या अर्ध्या हिश्शाएवढाच ?'

'होय, जवळ जवळ तेवढाच.'

'पण काय हो, महासागर आणि सागर यात काही फरक आहे काय ?'

'तसा काहीच फरक नाही, दिलीप ! पण कुठे कुठे महासागरही भूखंडाच्या मध्यभागी येतो आणि मग वेगवेगळे विभाग होतात. त्यांना सागर अथवा समुद्र म्हणतात. 'भूमध्य समुद्र' हे नाव ऐकलेच असशील तू.'

'हो. हो. ऐकले आहे.'

'युरोप, आशिया आणि आफ्रिका खंडाचे वेगळेपण भूमध्य समुद्रामुळेच लक्षात येऊ शकते.'

'हं. आणखी कोणते सागर आहेत ?'

'अमेरिकेत 'कॅरीबियन' व 'बेरिंग' सागर आहेत. कॅरीबियन समुद्रात पश्चिमी बेटे आहेत, तर बेरिंग समुद्रामुळे रशियापासून अमेरिकेचा अलास्का हा प्रदेश वेगळा झालेला आहे.'

'आणखी एक सांगा.'

'विचार.'

'काळा समुद्र, तांबडा समुद्र म्हणतात, ते रंगीत समुद्र कुठे आहेत वरं ?'

'दिलीप ! अरे, बहुतेक महासागर दिसायला निळेच दिसतात. पावसाळ्यात वर आभाळात ढगांनी गर्दी केली म्हणजे त्यांच्या

प्रतिबिंबामुळे सागराचे पाणी धुरकट दिसते. जिथे कुठे पाणी उथळ असते, तिथे खालच्या वाळूसारखा भुरकट, हिरवट रंग पाण्याचा दिसू लागतो. तसेच समुद्राला येऊन मिळणाऱ्या नद्या, वाहत येणारे बर्फ, तळात वाढणाऱ्या वनस्पती व प्राणी यामुळेही समुद्राच्या पाण्याचा रंग बदललेला दिसतो आणि या रंगावरूनच चीनमध्ये पिवळा समुद्र, उत्तर रशियामध्ये पांढरा आणि काळा किंवा तांबडा समुद्र म्हटले जाते.'

'अस्सं ! आणि मेक्सिकोचे आखात, इराणचे आखात म्हणतात ते काय ?'

'समुद्राचा काही भाग, पट्टा म्हण हवं तर, भूखंडात खूप आत खोलवर घुसलेला असतो; अशा ठिकाणाला खाडी किंवा आखात म्हणतात. ज्या ठिकाणाजवळ अशी आखाते आहेत, किंवा ज्या आखातांच्या काठांवर जे देश आहेत, त्या देशांच्या नावाने ते आखात वा खाडी ओळखली जाते.'

'म्हणजे एकूण काय, तर सगळे एकाच समुद्राचे भिन्न भिन्न प्रकार !' दिलीप म्हणाला.

'अगदी खरं आहे तुझं, दिलीप' जलपरी हसून म्हणाली.

समुद्राची बरीचशी प्राथमिक, परंतु तितकीच आवश्यक अशी माहिती आता दिलीपला झाली होती. त्याचा चेहेरा समाधानी दिसत होता. जलपरी म्हणाली,

'बरं तर, दिलीप ! आज एवढा फेरफटका पुरे झाला.'

'मग उद्या ?'

'उद्या जाऊया अद्‌भुत प्रदेशात !'

• •



# ४. अद्‌भुत प्रदेशात

अद्‌भुत प्रदेशात जाण्याच्या कल्पनेने दिलीप सुखावला होता. अनेक तऱ्हेच्या परीकथांमधून, रहस्यमय गोष्टीं-मधून त्याने अद्‌भुत देशांची व चमत्कारिक स्थळांची माहिती वाचली होती. ऐकली होती. त्याला अशा प्रकारच्या स्थळांविषयी मोठे कुतुहल वाटत असे. आकर्षण होते· आता तर काय, जलपरी स्वतःच त्याला अद्‌भुत प्रदेशात घेऊन जाणार होती ! त्यामुळे त्याला फार फार आनंद झाला होता. त्याची उत्सुकता वाढली होती.

सकाळी लवकरच तो तयार झाला. जलपरीला म्हणाला,

‘ निघायचं ना अद्‌भुत प्रदेश पाहायला ?’

‘ हो तर ! चल निघू या !’

जलपरी आणि दिलीप निघाले. कब्मरीन सुरू झाली. पाणी कापीत निघाली. जाता जाता कशावर तरी थटली. धाडकन आवाज झाला. थटून थोडी मागे हटली. दिलीप घाबरला. काय झाले ते त्याला कळेचना. तो गोंधळला. जलपरी हसून म्हणाली,

‘ भिऊ नकोस दिलीप !’

‘ काय झालंय ?’

‘ अरे, तुझी पाणबुडी पर्वतावर थडकली आहे.’

‘ पर्वतावर ? समुद्रात पर्वत कुठला ?’

‘ म्हणजे, तुला काय वाटलं की, पर्वत, डोंगर हे सर्व फक्त तुझ्या पृथ्वीच्या पाठीवरच आहेत ? नाही हं, सागराच्या उदरातही ते आहेत !’

‘ अजबच आहे !’

‘ हं. तर हा पहा सर्वात मोठा पर्वत जगातला !’

‘ जगातला ! अहो, समुद्रातला म्हणा. कारण आमच्या हिमालयाहून मोठा पर्वत जगाच्या पाठीवर कुठेच नाही.’ दिलीप छाती फुगवून अभिमानाने म्हणाला. जलपरी म्हणाली,

‘ जगाच्या पाठीवर नसेल, पण समुद्राच्या पोटात मात्र आहे.’

‘ खरं म्हणता ?’

‘ खोटं वाटत असेल, तर प्रत्यक्षच पहा तू.’

आणि जलपरीने मोठ्या कौशल्याने कब्मरीन पर्वताच्या बाजूबाजूने हाकारली. दिलीप पहात होता. मैलोन् मैल मागे पडत होते, पण पर्वतांची रांग काही संपत नव्हती. अवाढव्य अशी ती पर्वतश्रेणी पाहून दिलीप स्तिमित झाला. त्याने जलपरीला विचारले,

‘ आपण कुठं आहेत हो ?’

‘ मध्य अटलांटिक समुद्रात.’

‘ आणि हा पर्वत ?’

‘ हाच समुद्रातला लांबीने सर्वात मोठा पर्वत.’

‘ किती लांबी असेल याची ?’

‘ याची दक्षिणोत्तर लांबी सोळाहजार किलोमीटर आहे. आणि उंची, समुद्राच्या तळापासून तीन-चार किलोमीटर सहज भरेल !’

‘ बापरे !’

‘ पण ही उंची काहीच नव्हे. तुमचा हिमालय याहून उंच आहे.’

‘ हो !’

‘ मग चल, आपण प्रशान्त महासागरात जाऊ.’

‘ तिथंही पर्वत आहेत ?’

‘ सगळीकडंच आहेत.’

कब्मरीन पाणी कापीत प्रशान्त महासागराकडे चालली. दिलीपला हे अवाढव्य पर्वत पाहून आश्चर्य वाटत होते. त्याने जलपरीला विचारले,

‘ विशेष मोठे पर्वत कुठे कुठे आहेत ?’

‘ अजोर्संजवळील समुद्रात एक आहे. त्याची समुद्रसपाटीवरील उंची सात हजार फूट आहे.’

‘ वरती ? मग तळापासून ?’

‘ तळापासून आठ किलोमीटरहून जास्त उंची सहज भरेल !’

‘ वा !’ दिलीप आश्चर्याने म्हणाला. जलपरी सांगू लागली,

‘ ब्राझील व आफ्रिकेजवळील समुद्रातील ‘ सेंट पॉल ’ पर्वताची शिखरे सरळसोट आणि उंचच उंच अशी आहेत.’

‘ अस्सं !’

'कॅलिफोर्नियाच्या किनाऱ्याजवळ तर मोठा ज्वालामुखी पर्वत सागरात आहे.'

'हं !'

'आणि जमिनीवर जसे बिनशिखरांचे काही पर्वत असतात ना ?'

'हं. हं. सपाट !'

'तर असे बिनशिखरांचे पर्वत तर समुद्रात खूपच आहेत. आतापर्यंत तुम्ही माणसांनीच बुडी मारून सुमारे पाचशे शोधून काढले आहेत !'

'बापरे ! आणखी किती तरी असतील नाही ?'

'तर !'

कब्मरीन चालली होती. दिलीपचे आश्चर्य वाढत होते, जाता जाता बऱ्याच वेळानंतर पुन्हा एक धक्का बसला. दिलीपने स्वतःला सावरीत विचारले,

'कसला धक्का हा ?'

'त्या सर्वात उंच पर्वताचा.'

'कुठे आलोत आपण ?

'प्रशान्त महासागरातील हवाई बेटात.'

'आणि हा पर्वत ?'

'म्यूनाकी याचं नाव. हा ज्वालामुखी पर्वत असून खूपच खूप उंच आहे.'

'किती ?'

'सुमारे तीस हजार फूट !'

'तीस हजार !' म्हणजे एव्हरेस्ट शिखरापेक्षाही उंच !'

'हं !'

'बापरे ! बापरे !!'

दिलीप मान वर करून पहातच राहिला. कब्मरीन तळापासून वर वर उंचीवर चालली होती. किती उंच गेले तरी पर्वताची उंची संपतच नव्हती ! ती प्रचंड उंची पाहून त्याचा हिमालया-संबंधीचा अभिमान थोडा थिटा झाला. त्याला वाटले की, गौरी-शंकराला गर्व होऊ नये म्हणूनच हा पर्वतराज येथे समुद्रात दडून वसलेला दिसतोय !

' म्यूनाकीच्या अती भव्य उंचीने दिलीप दिपून गेला. तो पुट-पुटला, ' सागरातली ही अद्‌भुत गोष्ट खरी !' पण जलपरी लगेच म्हणाली,

' दिलीप, आतापर्यंत तू फक्त पर्वतच पाहिलेत.'

' मग ?'

' आणखी पुष्कळ अद्‌भुत गोष्टी आहेत. चल दाखवितेच तुला.'

कब्मरीन पाण्यामधून धावतच होती. आणखी अद्‌भुत गोष्टी पाहायला मिळणार म्हणून दिलीप मनातून खूष झाला होता. जाता जाता कब्मरीन एका सपाट मैदानावरून चाललेली पाहून दिलीपचे आश्चर्य आणखीनच वाढले. त्याने आजूबाजूला नीट निरखून पाहिले. पर्वत नव्हता, डोंगर नव्हता, शिखरे नव्हती, काही नव्हते. होते फक्त पाण्याचे खूपच लांबवर पसरलेले मैदान ! दिलीपने विचारले,

' हे कसलं मैदान दिसतं आहे ?'

' हा सागरातला पठारी प्रदेश !'

' पठारी प्रदेश ?'

' हं. सागरात जसे पर्वत आहेत, डोंगर आहेत, तशीच ही मोठ-मोठी पठारं पण आहेत !'

' आश्चर्यच आहे ! पण ही एवढी पठारं निर्माण कशी झाली

असतील बरं !'

'हं. बरा प्रश्न विचारलास, दिलीप. सागराने आज जो पृथ्वीवर व्यापलेला प्रदेश आहे, तो काही पूर्वीपासून, म्हणजे सागर जन्मल्यापासून एकच एक राहिलेला नाही !'

'मग ?'

'बऱ्याच वेळा त्याच्या जागेत बदल झालेला आहे !'

'म्हणजे समुद्र आज आहे तेथेच पूर्वीपासून नव्हता तर ?'

'नव्हता. पृथ्वीवर आज दिसणारी अनेक बेटे पूर्वी समुद्राच्या पोटात होती, तर फार प्राचीन काळी भूखंड असलेला प्रदेशच्या प्रदेश आज समुद्राच्या उदरात गडप झालेला आहे.'

'मग ही सपाटं पठारं कधी काळी उघड्यावर असतील !'

'हो. तुझ्या भारत देशाच्या किनाऱ्यापासून अंटार्क्टिकापर्यंत समुद्रात असेच एक विस्तीर्ण पठार आहे. अंटार्क्टिका ते मध्य अमेरिकेपर्यंतही प्रशान्त महासागरात असेच एक प्रचंड पठार आहे. शिवाय छोटी छोटी मैदानं किंवा पठारं तर समुद्रात अनेक आहेत. त्यांना इंग्रजीत 'बँक्स्' म्हणतात. अमेरिकेतील 'ग्रँड बँक्स' किंवा युरोपातील 'डॉगर बँक्स्' प्रसिद्ध आहेत.'

'अस्सं !' दिलीप या नव्या माहितीने थक्क झाला होता. तो त्या मैदानाकडं पहातच राहिला. 'कधी काळी माणसांना पाण्यात माशांप्रमाणे खेळता आले, तर ही मैदानं किती उपयोगी पडतील नाही !' अशी एक गंमतीदार कल्पनाही त्याच्या मनात चमकून गेली. तेवढ्यात जलपरी म्हणाली,

'हं दिलीप ! इथंच नाही थांबायचं आपल्याला.'

'आता कुठं जायचं आपण इथून ?' दिलीपने अगदी उत्सुकतेने विचारले.'

'आणखी अद्भुत गोष्टी पाहायला' जलपरी म्हणाली आणि कब्मरीन वेगानं धावू लागली. पाण्याचे थर बाजूला करीत जाऊ लागली. जाता जाता मैदानं मागे पडली. लहान, मोठे डोंगर मागे राहिले आणि दिलीपच्या लक्षात आले की आपण कुठं तरी खोल, खूप खोल अशा दरीत आलो आहेत. त्याने भयभीतपणे विचारले'

'कुठं आलो आहोत आपण ?'

'अटलांटिक महासागराच्या पोटातील एका प्रचंड गुहेत !'

'गुहा ? आणि समुद्रात ?'

'हो हो, गुहा. आणि समुद्रात ! पठारं पर्वत याप्रमाणे समुद्रात मोठमोठ्या दऱ्या, खोरी आणि प्रचंड गुहा देखील आहेत, दिलीप आता हीच गुहा पहा ना, सुमारे आठशे मैल लांब आहे आणि कडेच्या भिंती तर आठ फूट उंचीच्या आहेत.'

'आठशे किलोमीटर लांब ! म्हणजे अहो, भुयारच की !'

'हो ना.'

'अजब आहे बुवा !' दिलीप ती अजस्त्र गुहा निरखू लागला. जलपरी म्हणाली,

'एकेक खोरी तर फारच खोल आहेत दिलीप ! प्रशान्त महासागरात जपानच्या किनाऱ्याजवळ, हिन्दी महासागरात 'जावा' बेटांजवळ, अमेरिकेच्या 'पोर्टोरिको' या बंदराजवळ, फिलिपाइन्स् बेटांच्या जवळ अशा मोठमोठ्या दऱ्या आहेत.'

'त्यामुळे तेथे समुद्राचे पाणीही खोल असेल नाही का ?'

'अर्थात्. आता फिलिपाइन्स् बेटांजवळील खोलीच सुमारे पस्तीस हजार चारशे फूट आहे.'

'बापरे ! म्हणजे जवळ जवळ दहा किलोमीटर म्हणा की !'

'हो.'

‘पण काय हो, या गुहा, दऱ्या, खोरी समुद्रात कशी निर्माण झाली असतील ?’ दिलीपने विचारले. जलपरी सांगू लागली,

‘आता या बाबतीत तुम्हा माणसांपैकीच काही संशोधकांचे म्हणणे आहे की, या गुहा नद्यांमुळे बनल्या असाव्यात. काहींचे म्हणणे असे की पृथ्वीवर जेव्हा सर्वत्र बर्फच बर्फ पडत होते, तेव्हा त्या हिमयुगातील बर्फामुळे या निर्माण झालेल्या असाव्यात !’

‘म्हणजे समुद्रात नद्याही आहेत की काय ?’ दिलीपने विचारले.

‘तर ! मोठमोठ्या नद्या आहेत ! तुमच्या पृथ्वीवर नसतील एवढ्या मोठ्या !’

‘खरं म्हणता ?’

‘प्रत्यक्ष पहाच की.’ जलपरी हसून म्हणाली. कब्मरीन नदीच्या रोखाने धावू लागली. जाता जाता ते अमेरिकेतील अटलांटिक महासागराच्या किनाऱ्याजवळ आले. दिलीपने विचारले,

‘कुठे आलो आहोत आपण ?’

‘गल्फ स्ट्रीमजवळ !’

, म्हणजे ?’

‘म्हणजे एका मोठ्या समुद्री नदीजवळ. ही सर्वात मोठी नदी !’

‘गंगा, सिंधू, यमुना यांच्याहून मोठी ?’ दिलीपने विचारले.

जलपरी हसून म्हणाली, ‘खूपच मोठी. या नदीपुढे पृथ्वीवरील नद्या म्हणजे एखाद्या नाल्यासारख्या असतील. आणि ही नदी प्राचीन किती आहे, ठाऊक आहे ?’

‘किती ?’

‘जवळ जवळ सहा कोटी वर्षांची ही म्हातारी आहे !’

‘बापरे ! ऐकावं ते नवलच!’

समुद्रात अशा पुष्कळ नद्या आहेत. त्यांच्या पाण्याचा रंग

समुद्राच्या पाण्याहून निराळा दिसतो. काहींचा प्रवाह उष्ण वाटतो, तर काहींचा थंड. आणि वरं का दिलीप, समुद्राच्या पाण्यातून या प्रचंड पात्रांच्या नद्या वाहतात त्यावेळी कुठे कुठे तर त्यांचे दोन्ही किनारेही स्वच्छ दिसून येतात. यांच्या पाण्याचा वाहण्याचा वेगही तसाच भरधाव. आणि पृथ्वीवरील नद्यांप्रमाणेच ह्या नद्याही ऋतु, हवामान, वारे यांच्या योगाने आपला प्रवाह बदलतात. गल्फस्ट्रीम, भूमध्यरेखीय प्रवाह, लॅब्रॉडोर, इत्यादि समुद्री-नद्यांचे प्रवाह प्रसिद्ध आहेत. काहींची लांबी नऊ नऊ हजार मैल आहे !'


ही आश्चर्यजनक माहिती ऐकून दिलीप स्तंभित झाला होता. समुद्राच्या पोटात केवळ पाणीच पाणी असेल आणि दुसरे काहीच नसेल, अशी त्याची जी कल्पना होती ती किती फोल ठरली होती ! दिलीप मनाशीच पुटपुटला,

'खरंच, किती अद्भुत प्रदेश हा !'

'हा अद्भुत प्रदेश तर खराच दिलीप, पण आणखी कितीतरी मनोरंजक स्थळांना भेटी द्यायच्या आहेत. किती तरी चित्रविचित्र प्राणी, वनस्पती पाहायचे आहेत. एवढ्यात दमला नाहीस ना ?'

'छे ! छे ! मुळीच नाही.' दिलीप म्हणाला.

'मग उद्या जाऊया चित्रविचित्र सृष्टीत !'



## ५ चित्रविचित्र सृष्टीत

सकाळीच दिलीप कब्मरीनमधून जाण्यासाठी तयार झाला. जलपरी म्हणाली,

' निघायचे का, दिलीप ?'

' हो, हो. मी तयारच आहे.'

कब्मरीन सुरू झाली. पाणी कापीत धावू लागली. पाण्याच्या वेगवेगळ्या थरांतून घुसू लागली. जाता जाता दिलीपने पाहिले, तो दूरवर हिरव्यागार गवताचे एक प्रचंड कुरणच्या कुरणच दिसत होते. पांढेरी, पिवळी, निळी, इवली फुले देखील दिसत होती. दिलीपचा, ते दृश्य पाहून स्वतःच्या डोळ्यांवर विश्वासच बसेना ! त्याने जलपरीला विचारले,

'आपण समुद्राच्या पोटातच आहोत ना ?'

'हो तर !' जलपरी हसून म्हणाली, 'तुला काय वाटलं ?'

'समोरचं गवत, रंगीत फुलं पाहून मला वाटलं की, आपण जमिनीवरच आहोत.'

'दिलीप, पृथ्वीच्या पाठीवर ज्याप्रमाणे निरनिराळ्या वनस्पती, फुलं व वेली आहेत; त्याचप्रमाणे समुद्राच्या पोटातही आहेत.'

दिलीपला हे ऐकून फारच आश्चर्य वाटले. तो म्हणाला,

'म्हणजे समुद्राच्या पोटातही वनस्पती-सृष्टि आहे म्हणायची ?'

'तर ! आहेच. सागराच्या पोटातही प्रचंड गवताची कुरणं आहेत. तऱ्हेतऱ्हेची रोपटी, वेली आहेत. लहान लहान; तशीच लांबीरुंदीने प्रचंड देखील.'

'अस्सं !'

'हो. आणि बरं का दिलीप, पृथ्वीवर ज्याप्रमाणे वसंतऋतु येताच वेली आणि झाडे वहराला येतात, तशीच येथे पण वसंत ऋतूत वनस्पतींची रंगपंचमी साजरी होते'

'अरे वा !'

'आणि वहरलेल्या बागेतल्या फुलांफळांवर जशा मधमाशा, भुंगे, मुंग्या, मुंगळे तुटून पडतात. तसेच इथे मासे, खेकडे आणि इतरही बारीक-सारीक सागरी जीवजंतु तुटून पडतात.'

दिलीप या माहितीने अवाक् बनला होता. तो आश्चर्याने इकडे तिकडे पाहू लागला, तो एक सुंदर फूल त्याला दिसले. फूल कसे गेंदेदार आणि रसरशीत होते. दिलीपने विचारले,

'हे कसले फूल ?'

जलपरी हसली आणि म्हणाली,

'ते फूल नव्हे, दिलीप !'

'मग फुलासारखं तर दिसतंय !'

'दिसतंय फुलासारखं; पण तो आहे सागरी जीव !'

'खरं की काय ?'

'खरंच. त्याला म्हणतात प्रवाळ !'

'प्रवाळ ?'

'हं. प्रवाळाचे खडकच्या खडक आहेत सागराच्या पोटात !'

'म्हणता काय ?'

'खरंच ! कारण प्रवाळाचे बारीक-बारीक जीवधारी जंतु एक-मेकांवर अगदी घट्ट चिकटून बसलेले असतात. आणि बरं का, दिलीप ! प्रवाळाला पृथ्वीवरच्या लोकांनी सोने, चांदी, हिरे, माणके या मूल्यवान दागिन्यांत स्थान दिलेलं आहे. पोवळ्याची माळ पाहिली असशील, किंवा अंगठीलाही पोवळ्याचा खडा बसव-लेला पाहिला असशील कधी.'

'हो हो. पुष्कळ वेळा. पण हे हो कसले फूल ? केवढे पसरट आहे !'

'ते देखील फूल नसून एक प्राणीच आहे, दिलीप ! त्याला म्हणतात अष्टपाद !'

'म्हणजे त्याला आठ पाय आहेत की काय ?'

'हो ना ! आणि या पायांनी तो खेकडे, गोगलगायी पकडतो.'

'म्हणजे गोगलगायी पण आहेत सागरात ?'

'पुष्कळ. तू शंख, शिपले पाहिलेच असतील !'

'पाहिले काय ? साठवले देखील होते पुष्कळ.'

'हो ना ! मग ते शंख-शिपले देखील सागराच्या तळातलेच. ते पहा–' जलपरीने एका बाजूला बोट दाखवले. दिलीप पाहू लागला. शंख-शिपल्यांचे ढीगच्या ढीग दिसत होते. कितीतरी

आकारांचे. लहान, मोठे, मध्यम असे. आणि रंग सुद्धा मजेमजेचे. काही शंखांच्या अंगावरची नक्षी किती सुरेख होती ! आणि काही शिंपल्यांवरच्या आकृत्या किती नाजुक, रेखीव होत्या ! दिलीप मोहून गेला. काही शंख-शिंपले गोळा करून घ्यावेत बरोबर, असेही त्याच्या मनात आले. पण तेवढ्यात जलपरी म्हणाली,

'या शंख-शिंपल्यांतून गोगलगायीसारखे प्राणी राहतात. त्यांची ही घरेच म्हणायची.'

'अस्सं ! पण काय हो, मोती देखील होतात ना शिंपल्यांत !'

'हो तर ! सागर म्हणजे मोत्यांचे आगरच. समुद्राच्या पोटात मोती-पोवळी आहेत, म्हणून तर माणसांनी सागरात बुड्या घेतल्या खोलवर !'

माणसांचं दागिन्याचं वेड दिलीपच्या लक्षात आलं. तो हसला आणि म्हणाला,

'नाही तरी समुद्राला 'रत्नाकर' म्हणतातच !'

'हो ना ! आणि नावाप्रमाणे तो आहेही रत्नाकर ! अगणित तऱ्हेतऱ्हेची रत्नं इथं आहेत.'

'पण ही चांदणी हो कसली ?'

'चांदणी नव्हे ती. चांदणीच्या आकाराचा तोही एक सागरी-जीवच आहे त्याला पाच पाय आहेत बघ.'

'हो ना ! आणि पाय कसले ते, लांब लांब सापच दिसताहेत की !'

'म्हणूनच त्यांना सर्पाकार-तारे म्हणतात किती तरी रंगाचे असतात हे. आणि एक गंमत सांगू यांची ?'

'सांगा की.'

'जर एखाद्या दुसऱ्या आडदांड प्राण्याने यांच्यावर हल्ला चढवला

आणि त्या लढाईत यांचे दोन तुकडे झाले, तर काही दिवसांनी ते दोन तुकडे म्हणजे दोन सर्पाकार तारे बनतात.'

'अरे वा ! अजबच !'

'इकडे पाहिलेस का दिलीप !'

'हं, हं. काकडी दिसतेय् ती.'

'दिसतेय् काकडी ! पण आहे समुद्र-काकडी. एक प्रकारचा जीवच !'

'पण त्याचं शरीर कसं गिळगिळीत दिसतंय नाही !'

'हं. आणि त्याची गंमत सांगू का !'

'सांगा की !'

'ही काकडी जर दुसऱ्या प्राण्यावर रागावली, तर आपले पोट फाडून फेकून मारते.'

'अरे बापरे ! आणि पोट फाटल्यावर मग स्वतः नाही का मरून जात ?'

'नाही. पुन्हा दुसरे पोट यायला वेळ लागत नाही.'

'काय चमत्कार आहे !'

दिलीप त्या गिळगिळीत काकडीकडे पाहतच राहिला. तेवढ्यात जलपरी म्हणाली,

हे पहा दिलीप इकडे.'

दिलीप पाहू लागला. वऱ्याचशा छत्र्या त्याला दिसल्या. त्यानं विचारलं, 'ह्या छत्र्या कसल्या ?'

'ह्यांना म्हणतात छत्रीमत्स्य ! इंग्रजीत म्हणतात जेली फिश !'

'पण या माशांना ह्या छत्र्या का म्हणून ?'

'त्या छत्र्यातच त्यांचे शरीर असते. हे प्राणी अत्यंत हलके

असतात. या छत्र्यांमुळे त्यांना पाण्यात तरंगता येते.'

'आणि या इकडे कवडया दिसताहेत की !'

'होय. कवडयाच त्या.'

'इथं कशा त्या ?'

'अरे, कवडया म्हणजे देखील लहान लहान जीव-जंतूंची घरेच! त्यातील जीव सुकून गळून पडला म्हणजे कवडी रिकामी होते; तुम्हाला खेळायला किंवा माळा करायला. पण या रंगीबेरंगी, लहान-मोठया कवडयांच्या आत अतिशय कोमल अंगाचे जंतु वाढत असतात. वरची ही टणक कवडी म्हणजे त्यांचं रक्षण करणारी ढालच !'

आणि पलिकडे काजव्यासारखं काय चमकतंय ?'

'त्यांना 'नेरीस' म्हणतात. काजवे जसे रात्रीच्या अंधारात आपल्या शरीरातून प्रकाश टाकतात, तसेच हे सागरी किडे. यांच्याही अंगातून प्रकाश बाहेर पडतो. दिलीप, त्यांचे अंग पहा की, कसे पारदर्शक आहे !'

'हो. आणि ते निळ्या, हिरव्या रंगाचेही दिसताहेत. काहींचे शपूट तर गुलाबी आहे !'

'आणि हे दिसले जरी बारीकच, क्षुद्र, तरी पळतात मात्र फार भरधाव बरं का !'

'किती प्रकारचे हे जंतु !'

'अरे, आणखीही पुष्कळ आहेत. काही गोल, काही चपटे, काही लांबट, काही टणक, काही हलके, काही जड, नाना प्रकार आणि नाना आकार ! नाना रंग आणि नाना आकृत्या.'


दिलीप, ही समुद्राच्या पोटातली सृष्टी पाहून थक्क झाला. तो म्हणाला,

'शिवाय मासे वगैरे मोठे प्राणी आहेतच ना !'

'पुष्कळ. उद्या तुला काही समुद्री मासेच मी दाखविणार आहे.'

• •

म. सं. सं. कार्वे, वाचनालय शाखा.
बाल वाङ्मय विभाग
वा. क्र. २८५८ दिनांक ९।८।८३
विषय बा-वा. क्र. ....



## ६. मत्स्यदर्शन

समूद्राच्या तळातल्या अद्‌भुत प्रदेशाचे दर्शन घेऊन व चित्रविचित्र-सृष्टी पाहून दिलीपला मत्स्यदर्शनाची ओढ लागली होती. समुद्रातल्या माशांबद्दल त्याने खूप ऐकले होते. पुष्कळशी चित्रेही पाहिली होती.

दिलीप केव्हाच तयार झाला. जलपरी म्हणाली, ‘ चल दिलीप! ’

कब्मरीन चालू लागली. पाण्यातून धावू लागली. दिलीपने विचारले,

‘ देवमासा कुठे राहतो हो ? ’

जलपरी हसली. ती का हसली हे दिलीपला कळेना. त्याने विचारले,

'का, हसायला काय झालं ?'

'अरे देवमासा म्हणजे प्रचंड मासा ! त्यालाच 'व्हेल' असेही म्हणतात. सर्वशक्तीमान् प्रभूला देव म्हणून संबोधता तुम्ही; त्या अर्थानं व्हेलसारख्या माशाला 'देवमासा' हे नाव खरोखरच शोभून दिसतं !'

'पण काय हो ! व्हेलमासा खरंच अतिप्रचंड असतो ?'

'हो तर ! प्रचंड म्हणजे फारच प्रचंड !'

'किती प्रचंड ?'

'दिलीप, जसा हिमालयाहून उंच पर्वत समुद्रात आहे, जशी गंगा-सिंधू या नद्यांहून मोठी नदी समुद्रात आहे, जसे पामीरच्या पठाराहूनही मोठाली मैदानं समुद्रात आहेत, जशा जंगलातल्या वनस्पतींहून लांबलचक वनस्पती समुद्रात आहेत; तसेच पृथ्वी-वरच्या सर्व प्राण्यांपेक्षांही मोठा, प्रचंड प्राणी समुद्रातच आहे !'

'माणसापेक्षा प्रचंड ?'

'माणसापेक्षाच काय, पण तुमच्या गोष्टीतल्या राक्षसापेक्षाही प्रचंड ! किती प्रचंड सांगू ?'

'सांगा तर खरी !'

'विशाल व्हेल माशाची लांबी शंभर फुटांहूनही जास्ती असते !'

'अबबब ! आणि जाडी ?'

'जवळजवळ चाळीस फूट ! आणि वजन एकशे पंचवीस टन !'

'काय म्हणता ?'

'प्रत्यक्ष पहाच की ! तो पहा महाकाय व्हेल !'

दिलीप पाहू लागला. खरोखरच, व्हेल माशाचे ते लांब रुंद धूड पाहून छातीत धडकीच भरावी ! केवढा त्याचा जबडा ! शिकारी कुत्र्यासारखे दात ! आणि शेपूट किती लांब ! दिलीप पहातच

राहिला. जलपरी सांगू लागली,

‘व्हेल माशाच्या शेपटीतही मारुतीच्या शेपटीसारखे बळ आहे. शेपटीच्या एकाच तडाख्याने तो समुद्रावरच्या जहाजाचे तुकडे करून टाकतो! व्हेल हा सस्तन प्राणी आहे. म्हणजे आपल्या पिलांना तो दूध पाजू शकतो.’

‘जमिनीवरच्या प्राण्यांप्रमाणे ?’

‘हो. आणि बरं का दिलीप, व्हेलही खूप खूप वर्षांपूर्वी जमिनीवरचाच प्राणी होता. पण पुढे पुढे त्याला समुद्र आवडला. त्यावेळी तो इतका मोठा नव्हता. परंतु समुद्र त्याला मानवला. तो बराच सुटला. फुगला.’

‘आणि हे काय ? हा कुणाचा दात ? तलवारीसारखा !’

‘हं हं, तो आहे ‘नारव्हेल’ जातीचा मासा. त्याचा दात नऊ-नऊ फूट देखील लांब असू शकतो !’

‘कमालच आहे !’

‘थंड आणि शांत पाणी व्हेलला आवडते. व्हेलच्याही अनेक जाती आहेत. कुणाच्या पाठीवर कुबड असते, तर कुणाला छोटे छोटे पायही असतात. त्यामुळे कधी कधी काठावरही ते चालू शकतात ! काही मासे मात्र अगदी लहान, म्हणजे अर्धा-पाऊण इंचच असतात.’

‘माशांच्या किती जाती असतील बरं ?’

‘खूप ! पुष्कळ !’

‘म्हणजे किती ?’

‘आतापर्यंत तुम्हा माणसांतल्या संशोधकांनीच सुमारे वीस हजार जातींच्या माशांचा शोध लावलेला आहे !’

‘अरे बापरे ! एवढ्या माशांच्या जाती आहेत ? आणि पहिला

मासा केव्हा जन्माला आला असेल हो ?'

'जवळ जवळ तीस कोटी वर्षांपूर्वी ! आणि बरं का, दिलीप ! जगात जेवढी जीवसृष्टी आहे, त्यात माशांची संख्याच अधिक आहे. काही जातींचे मासे नद्यांच्या मुखातून समुद्र सोडून गेले असले, तरी जवळ जवळ पाऊण टक्के जातीचे मासे समुद्रातच आहेत ! काही माशांना थंड पाणी आवडते, तर काहींना उष्ण. काहींना खारे, तर काहींना गोडे. काहींना खोल, तर काहींना उथळ. आणि काही मासे जिथे खायला मिळेल तिथे जातात.'

'माशांचे खाद्य कोणते ?'

'मुख्यत: वनस्पती. समुद्रात 'डायटॉम्' आणि 'कोपेपॉड' नावाच्या तरंगत्या वनस्पती विपुल प्रमाणावर होतात. शिवाय काही मोठ्या जातीचे मासे छोट्या माशांना गट्टम करतात. लहान लहान किडे मटकावतात.'

'सगळेच मासे समुद्रात तरंगत हिंडतात का हो ?'

'नाही. काही मासे पाण्याच्या पृष्ठभागापासून जवळच तरंगत असतात, तर काही खाली असतात. माशांनाही आपल्या संरक्षणासाठी देवाने काही ना काही दिलेले असते. काहींना टणक कातडे, तर काहींना खवले. काहींना काटे, तर काहींना उडता येतील असे पंख.'

'म्हणजे मासे उडतात की काय ?'

'हो. काही मासे विमानासारखे उडतात. त्यांना विमानासारखेच पंख असतात. पाण्याबाहेर येऊन सुमारे वीस फूट उंच हवेत हे मासे उडू शकतात. पाण्याबाहेर येऊन एक सुळकांडी मारली की मग हे उडत उडत लांबवर जाऊन पाण्यात धपकन् पडतात. काही काही वेळा हे उडते मासे जहाजांवरही जाऊन आदळतात. यांचा

आकार जवळ जवळ फूटभर असतो. काही जातींचे मासे दोन फूटही लांब असतात.'

'आणि ही सापासारखी जात कोणती ?'

'ती आहे 'नलिकामत्स्य' नावाची जात– 'पाइप फिश'. एखाद्या नळीसारखेच त्या माशाचे शरीर आहे पहा दिलीप, हा मासा समुद्रातल्या गवतात, वेलीत राहतो. त्याचा रंगही तसाच आहे आणि हे इकडे पाहिलंस का ?'

'काय ते ? काळे काळे कुट्ट आणि किती बेडौल आहे !'

'याचं नावच आहे 'काळा मासा'. समुद्राच्या खाली सहा सात किलोमीटरवर अंधार असतो ना, तिथं हे मासे राहतात.'

'त्यांना दिसतं कसं मग ?'

'त्याची योजना देवानं केलेली आहे. पहा, काही माशांच्या डोक्यावर दिव्यासारखे असते, काहींच्या दोन्ही बाजूंनी प्रकाश पडतो. काहींना पोटातून प्रकाश मिळतो. फॉस्फरससारखा पदार्थ त्यांच्या शरीरात उत्पन्न होतो आणि त्यापासून त्यांना हा प्रकाश मिळतो.'

'आणि मत्स्यालयातले हे गुबगुबीत रावसाहेब कोण आहेत ?'

'त्यांचं नाव आहे 'ग्लोब फीश.' आपण त्यांना 'झेंडूजीराव' म्हणू या.'

'छान छान ! दिसताहेत मात्र तसेच हं.'

'हा मासा आपले शरीर फुगवू शकतो. फुग्यासारखे. पण काही माशांच्या अंगावर जे काटे असतात ना, ते मात्र फुगल्याबरोबर अंगभर ताठ उभे राहतात बरं का !'

'मग त्यांना काटेरी फुगे म्हणू या.'

'काही हरकत नाही. 'शल्य–मत्स्य' म्हणतातच त्यांना.'

‘ आणि इकडं हे कोण बसलंय गळ लावून ?’

‘ त्यांना ‘ गळधारी मासे ’ म्हणायला हरकत नाही, दिलीप. ‘ अँगलर फिश ’ त्यांचं नाव. मासे पकडायला माणसंच गळ लावतात असं नाही, तर काही मासेही दुसरे लहान लहान मासे पकडण्यासाठी गळ टाकून बसतात. ’

‘ पण हा गळ ते आणतात कुठून ?’

‘ जन्मतःच मिळतो निसर्गाकडून. ’

‘ म्हणजे ?’

‘ अरे, ते पहा ना ! त्या माशाच्या जबड्यावरच गळासारखी बारीक शेपटी आहे आणि त्या शेपटीच्या टोकाला मासाचा गोळा असावा, तसे आहे. तो खाण्यासाठी दुसरे मासे येतात आणि बिचारे गळाला लागतात. ’

‘ आणि ही इकडं वनस्पतींवर घरटी कसली दिसताहेत ?’

‘ माशांचीच. काही जातीचे मासे कावळा, चिमणी बांधतात तसं घरटं बनवतात आणि त्यात आपली अंडी घालतात !’

‘ अरे वा ! गंमतच आहे आणि हा उभा सरळ पोहणारा कोण?’

‘ तो आहे ‘ समुद्री घोडा. ’ या जातीचे मासे लांबलचक असतात. मधेच फुगीर शरीर आणि मानेवर घोड्यासारखे लांबट तोंड !’

‘ खरंच की हो ! घोड्यासारखंच दिसतंय !’

‘ म्हणून तर त्याला म्हणतात समुद्री घोडा; आणि हा इकडे पहा दिलीप, गोमुखी मासा !’

‘ खरंच की. गाईच्या तोंडासारखेच तोंड असून वर शिंगासारखा आकारही आहे. काय एकेक प्रकार तरी !’

‘ अरे, कितीतरी प्रकारचे मासे आहेत समुद्रात ! अगदी इव-

त्याशा आकारापासून ते व्हेल, स्क्वीड, शार्क यांसारख्या प्रचंड शरीरधारी माशांपर्यंत. आणि रंग, छटा, चमक, पारदर्शकपणा, यांचे तर अनंत प्रकार आहेत.'

दिलीप या विविध मत्स्यदर्शनाने स्तिमित झाला होता. माशांची सृष्टी एवढी विपुल आणि चित्रविचित्र असेल, याची त्याला कल्पना नव्हती. इतके आकार पाहून त्याला ईश्वरी रचनेचे आश्चर्य वाटल्याशिवाय राहिले नाही ! किती वेळ तो काही न बोलताच त्या विविधरंगी माशांकडे पहात होता. त्यांच्या हालचाली निरखीत होता. अगदी रंगून गेला होता.

जलपरी म्हणाली, 'चल दिलीप !'

'कुठं जायचं या नंतर ?' दिलीपने भानावर येत विचारले. जलपरी म्हणाली.

'आता होऊ या लाटांवर स्वार !'

• •

[illegible]
[illegible] 2656 [illegible] 9/8/8
[illegible]



# ७. लाटांवर स्वार

कब्मरीनमधून न जाता समुद्राच्या प्रचंड लाटांवर स्वार होऊन गंमत पाहण्याची जलपरीची कल्पना दिलीपला फार-फार आवडली. तो चटकन् म्हणाला,
'खरंच ! चला होऊया लाटांवर स्वार !'

आणि जलपरी व दिलीप पहाता पहाता एका प्रचंड लाटेवर स्वार झाले देखील ! डोंगराएवढ्या त्या लाटा शिवणापाणीचा खेळ खेळत होत्या. एकामागून एक धावत होत्या. एका पाठोपाठ एक पळत होत्या. पळता पळता ओरडत होत्या. गर्जना करीत होत्या. मधेच उंच उसळी मारीत होत्या. वर मान करून पाहत

होत्या. मधेच एखादा खडक भेटला, तर त्याला बुडवीत होत्या. ओलांडून जात होत्या. दूरवरच्या किनाऱ्यावर जाऊन आदळत होत्या. धडाड् धुम्म् आवाजांने दिशा गर्जून टाकत होत्या. किनाऱ्यावर पांढऱ्या शुभ्र फेसाची उधळण करीत होत्या. समुद्रात तरंगणाऱ्या नाना वस्तू, वनस्पती, प्राणी, शंख, शिंपले देखील किनाऱ्यावर येऊन पडत होते लाटांवर स्वार होऊनच !

दिलीप आणि जलपरी लाटेवर बसली खरी, पण क्षणार्धातच लाट पर्वताएवढी उंच गेली. गर्जना करीत फुगली आणि धाडकन् किनाऱ्यावर येऊन विरघळली. साहजिकच दिलीप आणि जलपरी एका किनाऱ्यावर लागले. लाटांच्या भयंकर तांडवाने भयभीत झालेल्या दिलीपने जलपरीला विचारले—

'कुठे आलो आहोत आपण ?'

'किनाऱ्यावर.'

'कशाला ?

'समुद्र आणि जमीन यांची लढाई पहायला.'

'लढाई ?

'हं. समुद्र आणि जमीन यांची लढाई सारखी सुरूच असते. पृथ्वीचा पाऊण हिस्सा समुद्राने आधीच जिंकून घेतलेला आहे. तरी पण या लाटांच्या रूपाने तो अजून हल्ला चढवीत असतोच आणि ह्या हल्ल्याने पृथ्वीवरची नुसती जमीनच नव्हे. तर गावेच्या गावे समुद्राने आपल्या उदरात गडप करून टाकली आहेत !'

'खरं म्हणता.'

'तर ! इंग्लंडच्या पूर्वकिनाऱ्यावर किंवा हॉलंडमध्ये, डेन्मार्कमध्ये समुद्राने असा विक्रम केलेला आहे. फार काय, काही संशो-

धकांचे तर म्हणणे आहे की, उत्तर अमेरिका व आशिया हे दोन भूखंड एकमेकांना पूर्वी जोडलेले होते.'

'मग ?'

'मग काय ! समुद्राने आक्रमण करून मधला प्रदेश बळकावला आणि हे दोन खंड अलग झाले.'

'पण काय हो, समुद्राने जसा जमिनीचा काही भाग बळकावला असेल, तसा काही दिलाही असेल, नाही का ?'

'हो हो, दिला तर ! म्हणून तर पृथ्वीवरती जमीन आणि जमिनीवर शहरे, गावे वसवून माणसे राहत आहेत. नाहीतर सारेच जलमय होऊन गेले असते ! लाटा आणि जमीन यांची लढाई, हल्ले-प्रतिहल्ले, समुद्रजन्मापासूनच चाललेले आहेत आणि या झगड्यामधून कधी जमीन विजयी झाली, तर कधी समुद्राने जमिनीला जिंकले. पृथ्वीवरचा आजचा कितीतरी भू-भाग हा पूर्वी समुद्राच्या पोटातच होता आणि बरं का दिलीप, समुद्र केवळ जमिनीशीच लढत नसतो, तर हवेशीही त्याची लढाई सुरूच असते !'

'अस्सं ?'

'अरे, या डोंगराएवढाल्या लाटा वाऱ्यामुळेच तर निर्माण होतात. तू बशीत चहा, कॉफी किंवा दूध घेऊन पितोस ना ?'

'हो.'

'दूध गरम गरम असते.'

'हो.'

'मग तू ते निवण्यासाठी तोंडाने त्यावर हवा सोडतोस. म्हणजेच फुंकतोस.'

'हो.'

'तू अशी हवा सोडलीस म्हणजे दुधावर लहान लहान लाटा येतात. खूप जोराने फुंकलेस तर दूध बशीतून ओसंडूनही जाते.'

'हो.'

'तसेच याही लाटांचे आहे, दिलीप! हवेमुळेच समुद्रावर तरंग उठतात. जेव्हा वारा शांत असेल, तेव्हा समुद्राच्या लाटाचे मंद धावणेही सुंदर दिसेल. पण जेव्हा वारा वादळी असतो, तेव्हा समुद्राचे तांडव देखील थरकाप भरविणारे असते!'

'या लाटांच्या तडाख्याने मोठमोठी जहाजे देखील बुडतात, नाही का हो?'

'हो तर! या लाटा तशा फारच शक्तिशाली असतात, दिलीप! आणि एकेक लाट कधी कधी शेकडो मैलांवरूनही आलेली असते.'

'लाट किती उंच जात असेल बरं?'

'पुष्कळच! अरे, स्कॉटलंडजवळील फारो नावाच्या बेटावर तर एकदा लाटांनी एवढा धुमाकूळ घातला की सुमारे चाळीस टन वजनाचा एक खडकच्या खडकच एकशे साठ फूट उंचीवर त्यांनी नेऊन टाकला!'

'अरे बापरे!'

'एकदा जावा बेटाजवळ एक ज्वालामुखी भडकला. त्यायोगे शंभर फुटांपेक्षाही उंचच उंच अशा लाटा उसळल्या व किनाऱ्या-जवळील सुमारे दोन हजार माणसांचा बळी घेतला.'

'अरेरे!'

'आणि त्या लाटांचा वेग ताशी सातशे मैल होता, दिलीप!'

‘ कमाल आहे ! म्हणजे लाटा या विध्वंसकारीच आहेत म्हणायच्या !’

‘ नुसत्या विध्वंसकारीच नाहीत काही, किनाऱ्याचे रूप पालटून शोभा वाढवणाऱ्याही आहेत. बारीक चंदेरी रेती आणून टाकणाऱ्या, त्यावर सुंदर शंख-शिपल्यांची पखरण करणाऱ्या आणि वाऱ्याच्या साहाय्याने नौका डोलवीत नेणाऱ्याही आहेत आणि वरं का दिलीप ! होणाऱ्या तुफानी वादळाचे भविष्यही याच लाटांच्या साहाय्याने कळू शकते. ’

‘ लाटा समुद्रावरच असतात का हो ?’

‘ पुष्कळशा समुद्रावरच असतात. परंतु समुद्राच्या पोटातही, जिथे दोन प्रवाह एकमेकांवर आदळतात किंवा थोडचा खाऱ्या पाण्यात अधिक खारे पाणी जिथे मिसळते, तिथे प्रचंड लाटा उसळत असतात.’

‘ वाऱ्याची बरीच सत्ता मग समुद्रावर चालते म्हणा की !’

‘ नुसत्या वाऱ्याचीच का ? आभाळातील चंद्र–सूर्य यांच्याशीही समुद्राचा तसा संबंध आहे. ’

‘ तो कसा काय ?’

‘ समुद्राच्या किनाऱ्याजवळ तू कधी पाहिले असशील दिलीप-की मोठा वालुकामय प्रदेश, खडक, पाण्यावाचून उघडे पडलेले असतात. पण कधी कधी ते समुद्राच्या पाण्यात डुबत असतात !’

‘ हो, हो; त्याला भरती–ओहोटी म्हणतात. ओहोटीच्या वेळी पाणी दूर दूर जाते आणि भरतीच्या वेळी पुढे पुढे येते !’

‘ बरोबर. तर ही भरती-ओहोटी जी होते ती चंद्र सूर्याच्या मुळेच ! विशेषतः चंद्रामुळे. ’

‘वा ! त्यांचा काय संबंध ?’

‘अंतरिक्षांतल्या ग्रहांमध्ये परस्परांत एक प्रकारचे आकर्षण असते.’

‘हो; त्याला गुरुत्वाकर्षण म्हणतात !’

‘हं. तुला ठाऊक आहे तर !’

‘हो. लोखंड जसे लोहचुंबकाकडे खेचले जाते तसेच की नाही?’

‘हो, हो. तर चंद्र हा पृथ्वीच्या फारच जवळचा उपग्रह आहे. म्हणून पृथ्वी आणि चंद्र यांच्यात अधिकच आकर्षण आहे. यामुळे स्वाभाविकपणेच समुदावरही त्याचा परिणाम होतो आणि चंद्र पृथ्वीभोवती प्रदक्षिणा करताना कधी जवळ येतो, कधी दूर जातो. त्यानुसार भरती–ओहोटी घडून येत असते. चंद्र-सूर्य एकाच रेषेत आले म्हणजे दोघांच्या आकर्षणामुळे भरती-ओहोटीही मोठी अथवा लहान होत असते.’

दिलीप लक्षपूर्वक ऐकत होता. लाटांवरोबर डुलत होता. भरतीचीच वेळ होती, त्यामुळे समुद्राला उधाण आले होते. दूरवरून पाठशिवणीचा खेळ खेळत लाटा एकामागोमाग एक येत होत्या. मधेच असलेल्या खडकांना धडका मारीत होत्या. फेसाने किनारा फुलवीत होत्या. हवेत पाण्याचे तुषार उडवीत होत्या. दिलीपला मौज वाटत होती आणि आश्चर्यही वाटत होते. तेवढ्यात कसलेसे पक्षी उडताना त्याला दिसले. पक्षी नवीनच होते. दिलीपने कधीही न पाहिलेले. त्याने कुतुहलाने विचारले,

‘हे कसले पक्षी ?’

‘हे समुद्रा-पक्षी. ‘अल्बॅट्रास’ आणि ‘फ्रिगेट’ अशी त्यांची इंग्रजी नावं ! अल्बॅट्रास फार दूरवर उडू शकतो आणि उडताना

त्याला आपले पंखही फारसे हलवावे लागत नाहीत. तो इतका दूर वर उडतो की समुद्रावरून जाणाऱ्या एखाद्या जहाजाचा पिच्छा तो कित्येक दिवस सोडीत नाही !'

'बापरे ! आणि झोप बीप मग ?'

'असं म्हणतात की, उडतानाच तो झोप घेत असतो समुद्रावरच जरी तो उडतो तरी अंडी घालण्याकरिता मात्र किनाऱ्यावर जातो.'

'अरे वा ! आणि हा हंसासारखा व लांब पंखांचा फ्रिगेट ?'

'तोही हवेत विनासायास उडू शकतो. मात्र बगळ्यासारखाच ढोंगी. दुसऱ्याने पकडलेले मासे स्वतःच मटकावतो. आणखी 'पफिन' नावाचाही एक पक्षी आहे. त्याचा पुढचा भाग पांढरा व मागचा काळा असतो. त्याच्या लांबच-लांब चोचीवर पिवळ्या, निळ्या व लाल रंगाच्या पट्ट्या असतात. 'गल', 'टर्न', प्लोवर', 'पेलिकन', 'सॅंड पायपर' असे कितीतरी आणखी पक्षी आहेत.'

'पेंग्विन पक्षी कुठे असतो बरं ?'

'पेंग्विन राहतो अंटार्क्टिकामध्ये. माणसासारखा तो उभा राहतो. विचित्र आवाज करतो. त्याची उंची चार फूटही असते.'

'म्हणजे किंचित् खुज्या माणसाइतकीच की !'


तेवढ्यात एका लाटेच्या तडाख्यासरशी दिलीप अंटार्क्टिकाजवळ पोहोचला देखील. समोरच पेंग्विन पक्ष्यांचा कळप होता. ते पांढरे, काळे, सोनेरी पक्षी पाहून दिलीपला गंमत वाटली. त्याने विचारले,

'जसे हे काही समुद्र-पक्षी जमिनीवर येतात, तसे जमिनीवरचे काही प्राणी समुद्राचा आश्रय घेतात की नाहीं ?'

'घेतात तर ! 'सील' आणि वालरस' नावाचे ते प्राणी. चल दाखवतेच तुला.'

एका प्रचंड लाट बेरिंग सागरात जाऊन थडकली. तलवारी-सारख्या दोन दातांचा वालरस बर्फाचा खडक फोडत होता. 'सील'-ची कातडी फारच मोहक आणि उबदार वाटत होती. बर्फाळ प्रदे-शात राहणारे हे प्राणी पाहून दिलीपला आश्चर्य वाटले. तो आश्च-र्याच्या समुद्रावरच तरंगत होता जणु !

[illegible], वाचनालय [illegible]
बाल वाङ्मय विभाग.
[illegible] 2८५५ दिनांक ९।८।८३
विभाग बा: वा ... क्र.. .........



# ८. पाणबुडी परतली

समुद्राचे विविधतापूर्ण अंतरंग पाहून दिलीप दिपून गेला होता. तो आश्चर्य करीत राहिला. विचार करता करता त्याला आठवले, समुद्र किती तरी परोपकारी आहे ! समुद्रावरच सर्वांआधी जीवाची उत्पत्ती झाली. त्याच लहानग्या जीवाची वाढ होता होता प्राणीसृष्टीत मोठी उत्क्रांती झाली.

समुद्रातच वनस्पतींची वाढ झाली. त्या वाढल्या आणि अन्य जीवांनाही त्यांनी वाढविले.

आणि सर्वांत महत्वाची गोष्ट म्हणजे, जी पृथ्वी केवळ उजाड, धूळमय, रखरखीत होती, त्या पृथ्वीवर समुद्राच्या पाण्याने नंदन-

वन फुलवले. जीवन वसवले !

समुद्र नसता तर पाणी नसते. पाणी नसते तर वाफ झाली नसती आणि मग पाऊस तरी कुठून पडला असता ?'

सूर्याचा प्रकाश जीवधारणेसाठी, वाढीसाठी जितका आवश्यक, तितकेच पाणीही आवश्यक म्हणूनच सूर्याला म्हणतात 'मित्र' आणि पाण्याला म्हणतात 'जीवन.'

'जीवन ! जीवन !' दिलीप मनाशीच पुटपुटला.

जलपरी म्हणाली,

'काय म्हणतोयस, दिलीप ?'

दिलीप भानावर येत म्हणाला,

'समुद्राचा आणि माणसाचा किती जवळचा संबंध आहे नाही!'

'तर ! समुद्राचे पाणी खारे असते यावरून नाही का तुझ्या लक्षात आले !'

,पण समुद्राचे पाणी खारे असते ते त्यात मिसळणाऱ्या क्षारामुळेच ना ?'

'हो; ते खरं. पण माणसाच्या शरीरातील रक्तही खारं असत माहीत आहे ना ?'

'हो; आहे माहीत.'

'म्हणजे माणसाचं रक्त आणि समुद्राचं पाणी यांच्यात केवढं साम्य आहे !'

'मग आता सांग, की, समुद्राचा आणि माणसाचा संबंध कसा आहे तो ?'

'अगदी रक्ताच्या नात्यासारखा !'

'हो; आणि म्हणून तर जीवनाला लागणारा क्षार मिठाच्या रूपाने आणि पावसाच्या स्वरूपात उदंड गोड पाणी समुद्र मान-

वाला देत असतो ! त्याशिवाय मौल्यवान् रत्नं, मोती, हे अलंकार, कितीतरी खनिजे, जगातील केवढ्या मोठ्या लोकसंख्येचे अन्न म्हणजे मासे, औषधी पदार्थ, रसायने– समुद्राचीच देणगी !'

'खरं आहे.'

'माणसानं धारिष्टय करावं, डोकं चालवून शोध लावावेत, तळाशी बुडी मारावी आणि अगणित संपत्ती मिळवावी. लाटांच्या पाठीवर जहाजं, आगबोटी हाकाराव्यात आणि पृथ्वीला वळसा घालावा. अनेक वर्णांच्या, अनेक धर्मांच्या अनेक रीतिरिवाजांच्या. भिन्न भिन्न भूखंडात पसरलेल्या आपल्याच भाईबंदांना भेटावं, मानवतेचा संदेश द्यावा. मानवतेचा धर्म जागवावा.'

जलपरी थांबली. बोलता बोलता ते तळाशी आले होते. कब्-मरीन दिसू लागली. तशी पुन्हा जलपरी म्हणाली,

'दिलीप ! समुद्राचं अंतरंग तुला दिसलं. कळलं. ते विविध आहे, उदार आहे !

'खरं आहे !

पृथ्वीवरच्या साऱ्या ईश्वराच्या लेकरांचं अंतरंग असं व्हायला हवं ! हाच समुद्राचा संदेश घेऊन जा ! अच्छा !'

जलपरी बघता बघता पाण्यात अदृश्य झाली. दिलीप पहातच राहिला. जलपरीचा महान् संदेश त्याच्या मनात घुमत होता. तो नव्या उत्साहाने कब्मरीनमध्ये बसला आणि परत यायला निघाला. कब्मरीन वेगाने पाणी कापीत वर निघाली. समुद्राच्या लाटा उस-ळत होत्या. दिलीपला वाटले, समुद्रही आपल्याला प्रेमाने निरोप देतो आहे !

अथांग समुद्र पसरलेला होता. एका पाठोपाठ एक लाटा पाठशिव-

णीचा खेळ खेळत होत्या. दिलीपचा हे दृश्य पाहता पाहता केव्हाच डोळा लागला होता.

आई आली, आणि उठवीत म्हणाली,

‘ दिलीप ! अरे, उठायचं नाही का ? कुठं बुडी मारली होतीस? ’

‘ दिलीप जागा होऊन समोरच्या कब्मरीनकडे पाहत म्हणाला,

‘ सागराच्या तळाशी ! ’

• • •

2656 दिनांक 9/5/01

BVBK-0402857

## अनिरुद्ध बाल-विज्ञान मालिकेतील
## ही पुस्तके तुम्ही वाचायला हवीत !

### राजा मंगळवेढेकर लिखित

- ☐ सागराच्या तळाशी
- ☐ आभाळातून चक्कर
- ☐ असा हा माणूस
- ☐ कोणे एके काळी
- ☐ पृथ्वी
- ☐ आप
- ☐ तेज
- ☐ वायू
- ☐ आकाश

### कृष्णाबाई मोटे लिखित

- ☐ प्राण्यांची अजबघरे
- ☐ जीवसृष्टीची नवलकथा